## स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३.२३०९७१०, E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

# प्रेसनोट

दिनांक:- ३१/०५/२०१८

## वणी ते कळवण रस्त्यावर ग्रामसेवकाची डिझायर कार लुटणारे ०७ दरोडेखोरांना स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केले गजाआड

---

दिनांक ०४ मार्च २०१८ रोजी कळवण येथील रहिवासी श्री. भाउराव नामदेव ठाकरे हे त्यांचे मालकीची स्विफ्ट डिझायर कार एम.एच.४१.व्ही.८६९८ हिचेत नाशिक बाजुकडुन कळवणकडे जात असतांना वणी ते कळवण रोडवर बोरीचापाडा शिवारात रात्रीचे ०८:३० वा.चे सुमारास अज्ञात ०४ ते ०५ अनोळखी इसमांनी त्यांचे ताब्यातील पांढरे रंगाची गाडी भाउराव ठाकरे यांचे कारला आडवी लावुन ‘तु आमचे गाडीला कट मारला आहे, पोलीस स्टेशनला चल’ असे सांगुन त्यांना बळजबरीने गाडीचे खाली उतरावुन मागील सिटवर बसविले, व चाकुचा धाक दाखवुन मारहाण करून त्यांना मातोरी गावाजवळ सुनसान ठिकाणावर सोडुन देवुन त्यांचे ताब्यातील मोबाईल फोन व स्विफ्ट डिझायर कार जबरीने लुटमार करून नेली म्हणुन **वणी पोलीस ठाणेस I गुन्हा रजि. नं. ३६/२०१८ भादवि कलम ३९५ प्रमाणे गुन्हा** दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील फिर्यादी श्री. भाउराव ठाकरे हे कळवण शहरातील रहिवासी असुन ते **पुणदगाव, ता.कळवण येथे ग्रामसेवक म्हणुन नोकरीस** आहे, त्यांनी सदरची स्विफ्ट डिझायर कार ही नवीनच घेतलेली होती.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी जिल्हयातील राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील लुटमारीचे गुन्हयांचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी वरील गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला, तसेच सदर गुन्हयाचे घटनास्थळ व गुन्हयातील आरोपीतांची गुन्हा करण्याची पध्दत याबाबत सविस्तर आढवा घेवुन तपासाची चक्रे फिरविली. त्याप्रमाणे दिनांक ३० मे २०१८ रोजी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी सदर गुन्हयातील अज्ञात आरोपी व चोरीस गेलेले स्विफ्ट डिझायर कारचा नाशिक शहरालगतचे गावांमध्ये शोध घेत असतांना पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त बातमीप्रमाणे इगतपुरी तालुक्यातील पिंपळगाव डुकरा शिवारात काही इसम गेले काही दिवसांपासुन नंबरप्लेट बदलावुन एक स्विफ्ट डिझायर कार वापरत असल्याचे समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने पिंपळगाव डुकरा, ता.इगतपुरी परिसरात रात्रभर सापळा रचुन संशयीत इसम नामे **१) प्रविण पुंजा पारधी, वय २८,** रा.निनावी, पिंपळगाव डुकरा, ता.इगतपुरी, **२) कृष्णा रामदास निसरड, वय २०,** रा. घोटी खु॥, ता.इगतपुरी यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी पिंपळगाव डुकरा, ता.इगतपुरी पसिरातील त्यांचे इतर साथीदारांसह सुमारे ०३ महिन्यांपुर्वी कळवण ते वणी जाणारे रोडवर एका इसमाची स्विफ्ट डिझायर कार अडवुन त्यास मारहाण करून मोबाईल फोन व स्विफ्ट डिझायर कार जबरीने लुटमार करून नेल्याची कबुली दिली आहे.

ताब्यात घेतलेले वरील आरोपीतांचे साथीदार नामे **३) योगेश तानाजी टोचे, वय ३५**, रा. साकुरफाटा, ता.इगतपुरी, **४) रोहिदास सोमनाथ वाकचौरे, वय ३०**, रा. पिंपळगाव डुकरा, ता.इगतपुरी, **५) हर्षद गारेच सहाणे, वय २२,** रा. हिवरे, ता.सिन्नर, **६) सचिन बाळकृष्ण टोचे, वय २७**, रा. भरवीर खु॥, ता. इगतपुरी, **७) सचिन कैलास जाधव, वय १८**, रा. पिंपळगाव डुकरा, ता.इगतपुरी यांना स्थागुशाचे पथकाने साकुरफाटा व पिंपळगाव डुकरा परिसरातुन ताब्यात घेतले आहे.

वरील गुन्हयात सदर आरोपीतांनी जबरीने लुटमार करून नेलेली **स्विफ्ट डिझायर कार आरोपी नामे योगेश तानाजी टोचे** याचे कब्जातुन हस्तगत करण्यात आली आहे. तसेच सदर आरोपीतांनी **गुन्हा करतेवेळी वापरलेली** सफेद रंगाची स्विफ्ट कार क्र.एच.१५.डी.सी.३८१६ जप्त करण्यात आली असुन वरील गुन्हयातील फिर्यादी यांची **जबरीने लुटमार करून नेलेली स्विफ्ट डिझायर कार क्र. एम.एच.४१.व्ही.८६९८** असा एकुण **१२ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील **आरोपी नामे योगेश टोचे** याचे सिन्नर ते घोटी रोडवरील साकुर फाटयावर गॅरेज असुन त्याने त्याचे वरील साथीदारांसह एखादी नवीन स्विफ्ट डिझायर कार चोरी करण्याचा प्लॅन रचला होता. त्यानुसार दिनांक ०४ मार्च २०१८ रोजी आरोपी योगेश टोचे याने त्याचे इतर साथीदारांना साकुर फाटा येथे बोलावुन त्याचेकडील स्विफ्ट कारमध्ये वणी येथे जावुन, वणी चौफुलीपासुन कळवणकडे जाणारे रस्त्यावर एक नवीन स्विफ्ट डिझायर कार अडविली, व सदर कारमधील इसमास चाकुचा धाक दाखवुन, मारहाण करून त्यास पाठीमागील सिटवर बसवुन मखमलाबाद ते मातोरी गावचे शिवारात सोडुन त्याचेकडील मोबाईल फोन व स्विफ्ट डिझायर कार जबरीने लुटमार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** पोलीस उपनिरीक्षक **श्री.मच्छिंद्र रणमाळे,** सपोउनि नवनाथ गुरूळे, रविंद्र शिलावट, पोहवा दिपक आहिरे, दत्तात्रय साबळे, पुंडलिक राउत, गणेश वराडे, पोना अमोल घुगे, पोकॉ हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, विश्वनाथ काकड, संदिप लगड, चापोकॉ राजु वायकंडे, योगेश गुमलाडू अशांचे पथकाने सदर गुन्हयातील ०७ आरोपीतांना ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.